**महाराष्ट्र शासन**

आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई- ४०० ०२३.

विषय : नमुना डिएस-५ अनज्ञप्तीचे नुतनीकरण तीन वर्षाकरिता करण्याबाबत.

**परिपत्रक**

**क्रमांक :** डिएनएस ११२०१५/इथेनॉल ब्लेंडींग/चार मुंबई दि. २१ डिसेंबर, २०१५.

मुंबई विप्रकृत मद्यार्क नियमावली, १९५९ मधील नियम, २६ (३) मधील तरतूदींनुसार औद्योगिक कारणास्तव विप्रकृत मद्यार्क बाळगणे व वापर करण्याकरिता जिल्हास्तरावर नमुना डिएस-५ अनुज्ञप्ती मंजूर करण्यात येते. याच नियमावलीतील नियम २८ नुसार डिएस-५ अनुज्ञप्तीचे ३ वर्षाच्या कालावधीकरिता नुतनीकरण करण्याच्या तरतूदीं आहेत.

उपरोक्त नमूद केल्यानुसार नियमांतर्गत तरतूदी असूनही या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही डिएस-५ अनुज्ञप्ती धारकांनी ३ वर्षाच्या कालावधीकरिता नुतनीकरण करण्याची विनंती केली असता, काही जिल्हा अधीक्षकांनी त्यांची विनंती अमान्य केली आहे. विशेषत: ऑईल कंपन्या धारण करत असलेल्या डिएस-५ अनुज्ञप्तीबाबत अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. केंद्र शासनाच्या धोरणानुसार वाहनाच्या इंधनात १० % इथेनॉलचे मिश्रण करण्याच्या कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्याकरिता डिएस-५ अनुज्ञप्तीचे नुतनीकरण दरवर्षी करण्याच्या कार्यपध्दतीत होणारा विलंब टाळणे गरजेचे आहे. त्यामुळे आपणास असे कळविण्यात येते की, नियमांतर्गत तरतूदीं विचारात घेता जे डिएस-५ अनुज्ञप्तीधारक त्यांच्या अनुज्ञप्तीचे ३ वर्षाच्या कालावधीकरिता नुतनीकरण करण्याकरिता अर्ज करतील अशा डिएस-५ अनुज्ञप्तीचे आवश्यक ते शुल्क आकारुन ३ वर्षाच्या कालावधीकरिता नुतनीकरण करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सदरच्या परिपत्रकीय सूचना तातडीने ऑईल कंपन्यांच्या निदर्शनास आणाव्यात. जेणेकरुन ऑइल कंपन्यांना पुढे परिपत्रकीय सुचनांनुसार डिएस-५ अनुज्ञप्तीचे नुतनीकरण ३ वर्षाकरिता करणे सुलभ होईल.

विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक विभाग, ... कार्यालय
आवक क्रमांक 1644
दिनांक 23/12/2015
विभाग

(विजय सिंघल)
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१) सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
२) सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क,
३) या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
४) कार्यासन क्रमांक १२ (५ प्रती)